# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२५**

-----------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक १७ जुलै, २०२५ / आषाढ २६, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(४)** | **उद्योग, मराठी भाषा मंत्री** | |
| **(५)** | **महिला व बालविकास मंत्री** | |
| **(६)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | |
| **(७)** | **कामगार मंत्री** | |
| **(८)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |

------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

------------------------------

## गोंदिया येथील बाई गंगाबाई रक्तपेढीत ब्लड कंपोनंट युनिट कार्यान्वित करणेबाबत

**(१) * १३९१८ श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अंतर्गत येणाऱ्या बाई गंगाबाई रक्तपेढीत ब्लड कंपोनंट सेपरेशन युनिट कार्यान्वित नसल्यामुळे थॅलेसेमिया व सिकलसेल या आजारांनी त्रस्त असलेल्या मुलांना प्लाझ्मा, पीआरसी, प्लेटलेट्स अशा आवश्यक रक्त घटकांचा पुरवठा होऊ शकत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याठिकाणी ब्लड कंपोनंट सेपरेशन युनिट सुरु करण्याबाबत रक्तमित्र श्री.विनोद चांदवाणी यांनी मागणी करुन आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दुर्गम भागातील रुग्णांना रक्तपुरवठा वेळेवर मिळण्याच्यादृष्टीने बाई गंगाबाई रक्तपेढीत त्वरित ब्लड कंपोनंट युनिट कार्यान्वित करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२) नाही.

(३) शासनामार्फत ह्यासाठी लागणारे यंत्र (Refriderated centrifuge) खरेदी केले असून त्यासाठी पूरक यंत्रसामुग्रीची खरेदी व दुरुस्ती चालू आहे. तसेच अन्न व औषध प्रशासनाकडे परवाना मिळविण्यासाठी संस्थेतर्फे कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानेगाव (ता.माढा, जि.सोलापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व कर्मचारी निवासस्थान इमारतींचे नव्याने बांधकाम करणेबाबत

**(२) * १३०२७ श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेगाव (ता.माढा, जि.सोलापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत, ऑपरेशन थिएटर व कर्मचारी निवासस्थान इमारतींची दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्राथमिक आरोग्य केंद्र व कर्मचारी निवासस्थान इमारतींची स्ट्रक्चरल ऑडिट बार्शी येथील भगवंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे विभागप्रमुख, सिव्हिल इंजिनिअर व प्राचार्य यांचेकडून करण्यात आले असून जुनी इमारत नष्ट करुन त्याठिकाणी नव्याने बांधकाम करण्याबाबतचा अहवाल गेल्या सहा महिन्यांपूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त अहवालातील शिफारशींनुसार नव्याने बांधकाम करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे,

(२) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र मानेगाव, ता. माढा येथील मुख्य इमारत व कर्मचारी निवास्थान इमारती जीर्ण झाल्याने त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट भगवंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी या संस्थेकडून करण्यात आले आहे. त्यानुसार सदरहू आरोग्य संस्थेचे बांधकाम पाडण्यास हरकत नसल्याबाबत विभागीय अधिक्षक अभियंता (सा.बां.वि.) यांच्याकडून प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन सदरील इमारत बांधकाम निर्लेखित करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येणार आहे.

(३) सदरहू आरोग्य संस्थेच्या जीर्ण इमारतींचे बांधकाम निर्लेखित करण्यात आल्यानंतर त्याठिकाणी नवीन इमारत बांधकाम करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) लागू नाही.

-----------------

## सायदे-मारुतीची वाडी (ता.मोखाडा, जि.पालघर) धरणाच्या दुरुस्तीबाबत

**(३) * १४०७६ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायदे-मारुतीची वाडी (ता.मोखाडा, जि.पालघर) येथे सन २००९ मध्ये बांधण्यात आलेल्या धरणाला गळती लागली असून माहे जानेवारी, २०२५ पासून धरणातील पाणीसाठा कमी होत असल्याने धरणाच्या शेजारी आणि या धरणाच्या कालव्यावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांची शेती धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत तीन वर्षांपासून अनेकदा धरणाची दुरुस्ती करण्यात आलेली असतानाही निकृष्ट दर्जाचे काम करुन कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांनी संगनमताने शासकीय निधीचा अपव्यय केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धरणातून अद्यापही पाणी गळती सुरूच असल्याची तक्रार मोखाडा पंचायत समितीचे माजी सभापती यांनी दिनांक ९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.परिवहन मंत्री यांच्याकडे करून सदर प्रकरणी चौकशी करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन धरणाची तातडीने दुरुस्ती करणेबाबत तसेच दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

मौजे सायदे मारुतीची वाडी ता.मोखाडा,जि. पालघर येथील लघुपाटबंधारे तलावाचे मुख्य धरणाचे काम पूर्ण झाले असून सन २००९-२०१० पासून पाणीसाठा करण्यात येत आहे. सदर धरणाच्या कालव्याचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नाही. तथापि, दि.०८/०६/२०२० रोजी मुख्य धरणाचे उर्ध्व बाजूला माती भराव खचल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पूर्ण संचय पातळीपेक्षा ३.५० मीटर उंचीचा पाणीसाठा कमी करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.

सदर योजनेच्या शिर्ष विमोचकातून गळती होत असल्याने गळती दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत करण्यात आलेले आहे. सदरचे काम दि.१० जून, २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात आले आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) योजनेच्या शिर्ष विमोचकातून गळती होत असल्याने सदरच्या गळती दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत सद्य:स्थितीत दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला एमआयडीसी येथील प्रादेशिक अधिकारी गैरव्यवहार करीत असल्याबाबत

**(४) * १२७१३ श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला एमआयडीसी येथील प्रादेशिक अधिकारी श्री. प्रशांत पाडाळकर यांनी शासकीय परिपत्रके डावलून स्वत: तयार केलेल्या नियमावलीचा धाक दाखवून कामे सुरु करुन गैरव्यवहार करीत असल्याने अनेक उद्योजक त्रस्त झाले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला येथे नियमित प्रादेशिक अधिकारी नसून त्या ठिकाणी नांदेड येथील प्रादेशिक अधिकारी प्रभारी म्हणून काम पहात असून ते सुध्दा श्री. प्रशांत पाडाळकर यांची वसुली वाढविणेसाठी अधिसूचित केलेली चुकीची नियमावली राबवित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उद्योजकांना न्याय देण्यासह गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) श्री. प्रशांत पाडाळकर, प्रादेशिक अधिकारी यांचेकडे दि.३१/०८/२०२४ ते दि.१३/०३/२०२५ पर्यंत प्रादेशिक अधिकारी, अमरावती या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. प्रादेशिक अधिकारी, अकोला हे पद रिक्त असल्याने श्री. पाडाळकर यांचेकडे प्रादेशिक अधिकारी, अकोला या पदाचा अतिरिक्त कार्यभार दि. ०६/०९/२०२४ रोजी देण्यात आला होता.

तद्नंतर दि.१३/०३/२०२५ च्या आदेशानुसार त्यांची बदली व्यवस्थापक (भूसंपादन) म्हणून करणेत आलेली आहे. श्री. पाडाळकर यांची बदली झाल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. त्याअनुषंगाने श्री. पाडाळकर यांची बदली पुन्हा दिनांक ०८/०४/२०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आली असून तक्रार अर्जावर विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) श्री. पाडाळकर यांच्या बदलीनंतर दिनांक १३/०३/२०२५ च्या आदेशान्वये श्री. धनाजी इंगळे, प्रादेशिक अधिकारी, नांदेड यांच्याकडे प्रादेशिक अधिकारी, अकोला या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक १३/०३/२०२५ ते दिनांक ३०/०५/२०२५ या कालावधीमध्ये सोपविण्यात आला असून त्या दरम्यान लघु उद्योग भारती यांचे मार्फत दि. २१/०५/२०२५ रोजी त्यांचेबाबत तक्रार केल्याचे दिसून येत आहे.

(३) श्री. प्रशांत पाडाळकर यांची मुख्य अभियंता यांचे कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे पदस्थापना करण्यात आली असून स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या तक्रार अर्जावर विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच लघु उद्योग भारती यांचेकडून प्राप्त तक्रारीवर अहवाल मागविला असून चौकशी अंती कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नोंदणीकृत खाजगी रुग्णालयांची तपासणी करणेबाबत

**(५) * ८३९३ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १९,३८८ नोंदणीकृत खाजगी रुग्णालयांची महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, २०२१ अंतर्गत तपासणी आरोग्य विभागाकडून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आखून दिलेल्या नियमांचे पालन न करणाऱ्या २,९३६ शुश्रुषागृहांना माहे एप्रिल, २०२५ मध्ये नोटीसा बजावण्यात आल्या असून त्यांना नियमांची पूर्तता करण्यासाठी एका महिन्यांची मुदत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नोटीस बजावल्यानंतर किती शुश्रुषागृहांकडून नियमांची पूर्तता करण्यात आली,

(४) तसेच, नियमांची विहीत मुदतीत पूर्तता न करणाऱ्या शुश्रुषागृहांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१), (२),(३) व (४) हे खरे आहे.

महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम २०२१ अंतर्गत दिलेल्या सुचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन होते किंवा नाही याची तपासणी करण्यासाठी महाराष्ट्रात धडक मोहिम घेण्यात आली असून त्याअंतर्गत २३,३५४ रूग्णालयांची तपासणी जिल्हास्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिके मार्फत करण्यात आली असून त्यापैकी ४८०७ रूग्णालयांना दर पत्रक न लावणे किंवा इतर त्रुटीबद्दल एका महिन्यात सुधारणा करण्यासंदर्भात नोटीस देण्यात आली. त्यानंतर त्या रूग्णालयांची पुर्नतपासणी करण्यात येत आहे. दि. २७/०६/२०२५ पर्यंत १३६४ रूग्णालयांची पुर्नपडताळणी करण्यात आली असून, उर्वरीत रूग्णालयांची पुर्नतपासणी क्षेत्रीय स्तरावर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डिगस (ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी निधीचा अपव्यय केल्याबाबत

**(६) * १४५०९ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिगस (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायत प्रशासनाने मासिक सभेच्या खोट्या ठरावाद्वारे लेखा संहिता, २०११ नुसार ३५ टक्के खर्च मर्यादेचे उल्लंघन करून ग्रामपंचायत निधीचा मोठ्या प्रमाणात अपव्यय केला असल्याबाबतची लेखी तक्रार एका स्थानिक नागरिकाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, तसेच गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कुडाळ यांचेकडे दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीने सन २०२३ मध्ये खरेदी केलेल्या वस्तू अद्यापही ग्रामपंचायतीमध्ये पडल्या असून त्यांपैकी बहुतांश वस्तू नादुरुस्त आहेत तसेच उक्त ग्रामपंचायतीने जी. एम. पोर्टलवर सदोष खरेदी प्रक्रिया राबविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामपंचायतीने तब्बल २७ वर्षांपासून एका संस्थेने अतिक्रमण केलेली कॅटल हाऊसची इमारत दिनांक ५ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास ताब्यात घेतली असतानाही आजमितिपर्यंत संबंधित संस्थेकडून दंडात्मक रकमेची वसुली करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार हेतुपुरस्सर कर्तव्य कसूर करून ग्रामपंचायतीचे आर्थिक नुकसान करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

१५ वा वित्त आयोग (ग्रा.प.स्तर) अनुदानातून ग्रामपंचायतीने सन २०२३-२०२४ आर्थिक वर्षांमध्ये १३०० कचराकुंड्या खरेदी केल्या असून ८३९ कचराकुंड्या ग्रामस्थांना वाटप केलेले आहे आणि १००० कापडी पिशव्या खरेदी केलेल्या असून ८१० पिशव्यांचे ग्रामस्थांना वाटप केलेले आहे. ग्रामपंचायतीने खरेदी केलेली झेरॉक्स मशीन सध्या नादुरुस्त आहे. जी. एम. पोर्टल वरील खरेदी प्रक्रिया सदोष नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) तत्कालीन ग्रामपंचायत कार्यकारिणी तसेच विद्यमान ग्रामपंचायत कार्यकारणी यांच्यावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ३८ अन्वये कर्तव्यात कसूर केली असल्याने नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक यांचे प्रलंबित मानधन अदा करणेबाबत

**(७) * ११८३६ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक यांचे मागील ५ ते ६ महिन्यांपासूनचे मानधन प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक यांना प्रलंबित मानधन त्वरीत अदा करणेबाबत व त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून मानधन/ मोबदला देण्यात येतो. राज्य शासनाचे मानधन / मोबदला नियमितपणे देण्यात येतो. तथापि, केंद्र शासनाचा निधी माहे जानेवारी, २०२५ पासून प्राप्त न झाल्याने मोबदला प्रलंबित होता. केंद्र शासनाकडून दि.०४/०७/२०२५ रोजी सदर निधी प्राप्त झाला असून केंद्र शासनाकडील प्रलंबित मोबदला प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) वर नमूद केल्याप्रमाणे

-----------------

## वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील तसेच गडचिरोली जिल्हयातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करणेबाबत

**(८) * ९७२० श्री.संजय देरकर (वणी), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामीण व दुर्गम भागात बोगस डॉक्टरांचा वावर वाढला असल्याने अशा डॉक्टरांविरोधातील शोध मोहीम हाती घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारवाईचा आराखडा तयार करण्यात आल्यानंतरही तालुक्यातील एकाही बोगस डॉक्टरवर अद्याप कारवाई करण्यात आलेली नसल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, गडचिरोली जिल्हयातील आरोग्य केद्रांलगत अनेक विनापदवीधारक बोगस डॉक्टर अवैध व्यवसाय करीत असून चुकीच्या उपचारांमुळे अनेक रुग्णांना पक्षघात, ह्दयविकार झाल्याबाबतची अनेक प्रकरणे समोर आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सन २०२० पासून ते आतापर्यंत यवतमाळ जिल्ह्यात एकूण २० बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली आहे. सन २०२२ मध्ये वणी तालुक्यात एका बोगस डॉक्टरावर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर कार्यवाही करण्याकरिता जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय तसेच नगर पालिका व महानगरपालिका स्तरावर अनुक्रमे जिल्हाधिकारी, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी व मनपा आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५/०९/१९९१ रोजीच्या शासन निर्णयान्वये शोध समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच, बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरिता

दि.०७/०२/२००० रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समिती गठीत करण्यात आलेली आहे. बोगस वैद्यकीय व्यावसायिकांविरूद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ च्या कलम ३३, ३३(अ) व ३८ नुसार कारवाई करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे व सूचना दि.१९/०८/२००० रोजीच्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. विभागाच्या सदर उपाय योजनेस अनुसरून बोगस वैद्यकीय व्यावसायिकांचा आढावा घेऊन संबंधित न्यायालयात खटले दाखल करण्याची कारवाई पोलिस यंत्रणेमार्फत वेळोवेळी करण्यात येते. सदर कार्यवाहीत बोगस डॉक्टरांवर महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ चे कलम ३३, ३६ व भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४१९ व ४२० अंतर्गत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करून मा. न्यायालयामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अधिनस्थ संस्थांमधील अधिपरिचारिका (गट-क) भरती प्रक्रीयेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(९)** * **१३१४६ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अधिनस्थ संस्थांमधील अधिपरिचारिका (गट-क) संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी सन २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या परिक्षेत अपात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी मुंबईतील डीएमईआर कार्यालय शेजारी असलेल्या रुग्णालयाच्या इमारतीत होत असून रु.१५ ते २० लक्ष घेवून नियुक्ती पत्र देण्यात आल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार महिला परीक्षार्थी यांनी मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण, सचिव, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्याकडे माहे जून, २०२५ मध्ये केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, स्टाफ नर्स या पदासाठी सन २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत एका परिक्षार्थीस परीक्षा काळात धुळे येथील दोन व्यक्तींनी या पदावर थेट नियुक्ती करून देण्यासाठी रु. १० लाख इतक्या रकमेची मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यासह दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) यासंदर्भात वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी संचालनालयाच्या स्तरावर दि.०६/०६/२०२५ अन्वये सहसंचालक (दंत) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रुग्णालयात भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार रुग्णांना मुलभूत सुविधा देणेबाबत

**(१०) * ८२९३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक जिल्हा रुग्णालयात दर १० लाख लोकसंख्येमागे २२० खाटांची गरज असताना २१ जिल्हा रुग्णालयांपैकी १६ जिल्हा रुग्णालयांमध्ये भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार खाटा उपलब्ध नसणे, २१ जिल्हा रुग्णालयांत ५६ टक्के खाटांची कमतरता असणे तसेच वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न बालरोग,स्त्रीरोग आणि प्रसूती रुग्णालयातही खाटांची कमतरता असल्याची माहिती लेखापरिक्षण (कॅग) अहवालाद्वारे दिनांक २० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा रुग्णालयात दुर्गम व ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांना आवश्यक त्या मूलभूत सुविधांसह औषधोपचार सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने निधी मंजूर करुन दिला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रुग्णालयात भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार खाटा उपलब्ध करणेसह रुग्णांना आरोग्य विषयक मुलभत सुविधा तसेच निधी उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) महालेखापालांच्या अहवालात सदर निरीक्षण आहे, हे खरे आहे. तथापि, केवळ सार्वजनिक आरोग्य विभागाकडील आकडेवारी विचारात घेतली तरी सदर २१ जिल्ह्यापैकी १४ एवढया जिल्ह्यांमध्ये खाटांची संख्या भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांच्या प्रमाणकांशी तुलना करता जास्त आहे.

तसेच इतर ०७ जिल्हयांच्या संदर्भात नमूद करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य सेवा ही सार्वजनिक आरोग्य विभाग बरोबरच वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग तसेच नगर विकास विभाग यांच्यामार्फतही दिली जाते. तरीही, काही ठिकाणी कमतरता असेल तर ती कमतरता भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांच्या प्रमाणकानुसार पूर्ण करण्यात येत आहे.

(२) नियमित अर्थसंकल्पात आणि पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणाऱ्या निधीतून मूलभुत सुविधांसह औषधोपचार सेवा उपलब्ध करुन दिली जाते.

(३) वर (१) व (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील विष्णूपूरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय व रुग्णालयात एम.आर.आय. (३ Tesla Machine) मशीन उपलब्ध करणेबाबत

**(११) * १३३३८ श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील विष्णूपूरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात एम.आर.आय. (३ Tesla Machine) मशीन उपलब्ध नसल्याने रुग्णांना खाजगी रुग्णालयात एम.आर.आय. करण्यासाठी लाखो रुपये खर्च करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या मानांकनानुसार सदरील मशीन या पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी व रुग्णांवर उच्च दर्जाच्या व अत्याधुनिक पद्धतीने इलाज करण्याकरीता आवश्यक असते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एम.आर.आय. (३ Tesla Machine) मशीन खरेदीसाठी रक्कम मंजूर करण्यात येण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांना दिनांक ०९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रुग्णालयात एम.आर.आय. (३ Tesla Machine) उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नांदेड येथील संस्थेत एम.आर.आय. मशीन उपलब्ध नसल्याने सदर रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना एम.आर.आय. चाचण्या करुन घेण्याकरीता नांदेड येथील स्थानिक डायग्नोस्टिक सेंटर यांचे समवेत सामंजस्य करार करुन महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत शासकीय दरात एम.आर.आय.च्या तपासण्या करण्यात येतात.
(२) होय.
(३) होय.
(४) सदर संस्थेचा एम.आर.आय. (३ Tesla Machine) मशीन खरेदीचा प्रस्ताव प्राप्त झालेला असून संचालनालय स्तरावरील तांत्रिक समिती मार्फत छाननी सुरु असून प्रस्ताव विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यांच्याशी संलग्न रुग्णालयांमध्ये आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली (एचएमआयएस) कार्यान्वित करणेबाबत

**(१२) * ७४८३ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यांच्याशी संलग्न रुग्णालयांमध्ये आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली (एचएमआयएस) राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने बंधनकारक करूनही मागील अडीच वर्षांपासून सदर प्रणाली कार्यान्वित झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही प्रणाली बंद असल्याने रुग्णांच्या नोंदी, त्यांच्या चाचण्यांचे अहवाल आणि औषधोपचारांसंदर्भातील माहिती हाताने लिहावी लागत असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पाच वर्षाच्या इंटरनेट सुविधेसाठी रु. ३२ कोटी २१ लाख इतका निधी मंजूर केला. तथापि, आवश्यक असलेले लोकल एरिया नेटवर्क (लॅन) व इंटरनेट अद्याप सुरू न झाल्याने आणि ऑपरेटरची नियुक्ती न झाल्याने रुग्णालयातील संगणक विनावापर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी सदर प्रणाली तातडीने कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही.
(२), (३) व (४) हे अंशतः खरे आहे.

NIC च्या माध्यमातून माहे नोव्हेंबर, २०२३ पासून Next Gen e-Hospital या आरोग्य व्यवस्थापन प्रणालीकरीता आवश्यक Hardware, Broadband, LAN Infrastructure आणि डाटा एन्ट्री ऑपरेटर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच टप्प्याटप्प्याने रुग्णसेवेकरीता आवश्यक त्या प्रक्रिया ऑनलाईन करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धाराशिव येथे बनावट गोळयांचा पुरवठा केल्याप्रकरणी पुरवठादार व कंपनी यांचेवर कारवाई करणेबाबत

**(१३) * ९२८५ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा शल्यचिकित्सक, धाराशिव येथे अँमॉक्सिलीन या अँटीबायोटिक गोळयांचा बनावट पुरवठा केल्याप्रकरणी गोळयाचे नमुने प्रयोग शाळेकडे पाठविण्यात आले असता सदर गोळया अप्रमाणित असल्याचा अहवाल दिनांक २९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात दोषी पुरवठादार व कंपनी यांच्या विरूद्ध विलंबाने म्हणजे दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास धाराशिव शहर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विलंबाने गुन्हा दाखल करण्याची काय कारणे आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी पुरवठादार व कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर गोळयांची उत्पादक कंपनी मे.ग्रिस्टल फार्मूलेशन्स, उत्तराखंड असून गोळयांचा पुरवठा मे.ॲक्टीवेन्टीस प्रा.लि. कशेळी, भिवंडी यांचेकडून झालेला आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक, नांदेड यांच्या कडील शिल्लक गोळयांचा साठा सन २०२३ चा नवरात्र महोत्सव तुळजापूर येथील आयोजित महाशिबिराकरीता वापरण्यात आला व त्यामधून जिल्हा शल्यचिकित्सक, धाराशिव यांना उपलब्ध झालेला आहे.

प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे जिल्हा शल्यचिकित्सक, नांदेड यांनी सदर गोळयांचे नमूने तपासणीसाठी NABL प्रमाणित श्री. साई टेस्ट हाऊस, प्रा.लि., न्यू दिल्ली यांच्याकडे पाठविले असता तपासणी अहवाल प्रमाणित आला. मात्र आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांच्या दि.०३/१०/२०२४ च्या पत्रानुसार सदर गोळयांचे नमूने औषध निरीक्षक,अन्न व औषध प्रशासन यांच्यामार्फत अन्न व औषधी प्रशासन, प्रयोगशाळा, मुंबई यांच्याकडे तपासणीसाठी पाठविले असता दि.१९/१२/२०२४ रोजीच्या अहवालात औषधे अप्रमाणित असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सर्व अप्रमाणित गोळयांचा साठा अन्न व औषध प्रशासनाने जप्त केला.

सदर औषधांचा पुरवठा जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड यांना मे. जया एंटरप्रायझेस लातूर यांच्याकडून झाल्याचे अन्न व औषध प्रशासनास आढळून आले. तथापि जया एंटरप्रायझेस यांनी औषधांचा पुरवठा

मे. ॲक्टीवेन्टीस प्रा.लि. कशेळी, भिवंडी यांचेकडून झालेला असल्याचे निदर्शनास आले.

अन्न व औषध प्रशासन विभागाने दि.१०/०१/२०२५ च्या पत्रान्वये औषधी पुरवठा तपशिलाबाबत संबंधित पुरवठा कंपनीकडे विचारणा केली असता नमूद पत्यावर पुरवठादार आढळून न आल्याने पत्र पोस्टाद्वारे परत आले. त्यानंतर औषध उत्पादक कंपनी मे.ग्रिस्टल फार्मूलेशन्स, उत्तराखंड यांना औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० नियम १८A, १८B, २२(१), २३ व २५ च्या पुर्ततेसाठी पत्राने कळविण्यात आले. मात्र, नमूद पत्यावर कंपनी आढळून आली नसल्याने सदरचे पत्र देखील पोस्टातून परत आले.

सबब, कंपनीच्या खात्रीसाठी औषधावरील नमूद मार्केटेड बाय मे. वेलडन फार्मा, प्लॉट नं. २७/३, सिरमौर,हिमाचल प्रदेश यांना दि.१४/०१/२०२५ रोजी पत्र पाठविण्यात आले. परंतु नमूद पत्त्यावर सदर कंपनी आढळून आली नाही व सदरचे पत्रही पोस्टाद्वारे परत आले. केंद्रिय औषध मानक नियंत्रण संघटन, डेहराडून यांनी अशा नावाची कोणतीही कंपनी नमूद पत्यावर अस्तित्वात नसल्याचे दि.१९/०२/२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

तद्नंतर दि.०४/०३/२०२५ रोजी मे. ॲक्टीवेन्टीस प्रा.लि., कशेळी, भिवंडी या कंपनीला ई-मेल वर पुन्हा पत्र पाठविण्यात आले. सदर कंपनीने दि.०५/०३/२०२५ च्या ई-मेलद्वारे औषधांचा पुरवठा मे.काबिज जेनेरिक हाऊस, शांती नगर, मिरारोड (पूर्व), जि. ठाणे यांचेकडून झाला असल्याचे कळविले आहे. परंतु सदर कपंनीबाबतची कागदपत्रे सादर केली नाही. त्यानंतर त्यांना दि.१०/०३/२०२५ रोजी व्हॉटस ॲप वर संपर्क साधून नोटीस पाठविण्यात आली. सदर नोटीसच्या अनुषंगाने मे. ॲक्टीवेन्टीस प्रा.लि. कंपनीच्या वकीला मार्फत प्राप्त झालेल्या खुलाशामध्ये औषध विक्रिचा तपशिल नमूद नाही. त्यामुळे १) मे.जया एंटरप्रायजेस, लातूर, २) मे.ॲक्टीवेन्टीस प्रा.लि. कशेळी, भिवंडी व ३) मे.काबीज जेनेरीक हाऊस,ठाणे यांचेविरुध्द दि.०८/०४/२०२५ रोजी धाराशिव पोलीस स्टेशन येथे अन्न व औषध प्रशासन विभाग धाराशिव यांचे मार्फत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील संपादीत केलेल्या जमीनी आदिवासी समाजास परत देणेबाबत**

**(१४) * १३१८१ श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील दाबचरी, वांकस आणि टोकराळे येथील आदिवासी समाजाकडून दुग्ध प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या ४६० हेक्टर शासकीय जमिनींपैकी ३७७.२६ हेक्टर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) साठी निश्चित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन औद्योगिक विकास महामंडळ हे रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीला बायोगॅस प्रकल्प उभारणीसाठी हस्तांतर करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डहाणू तालुक्यामध्ये ५०० एकर क्षेत्रावर औद्योगिकीकरण करण्याची मर्यादा असताना एवढे मोठे क्षेत्र एका खाजगी कंपनीला देऊन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे व पर्यावरण विभागाच्या निर्देशांचे उल्लंघन करीत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा जमीन हस्तांतरणाचा निर्णय रद्द करून सदर जमीन आदिवासी समाजाला परत मिळवून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) महसूल व वन विभाग, शासन ज्ञापन दि.१०/१०/२०२४ नुसार मौजे दापचरी व वंकास, ता.डहाणू येथील ३७७.२६.१९ हे.आर. शासकीय जमीन व मौजे टोकराळे, ता.जि. पालघर येथील १२५.५५.२ हे.आर शासकीय जमीन म.औ.वि. महामंडळास प्रदान करण्यात आली आहे.
(२) सदर जमीन वाटपासंदर्भातील कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

केंद्र शासनाचे दि. १९/१२/१९९६ चे अधिसूचनेनुसार Dahanu Taluka Environment Protection Authority (DTEPA) ची स्थापना करण्यात आलेली आहे.

मा. न्यायालय, Dahanu Taluka Environment Protection Authority (DTEPA) यांनी दि.२९/०४/२०२५ रोजीच्या आदेशान्वये (Order) मे. रिलायंस इंडस्ट्रिज लिमिटेड यांना १८ एकर जमीन CBG Plant उभारणेकरीता व उर्वरित जमीन बायोगॅस उत्पादनाकरीता लागणारा नेपियर ग्रास लागवडीकरीता परवानगी दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हयातील देहगांव येथील ग्रामपंचायत सरपंच व सचिवाने पदाचा गैरवापर केल्याबाबत**

**(१५)** * **९८७९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील कळमेश्वर तहसिल अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत दहेगाव येथील पाडाळे लेआऊट मध्ये खरेदी केलेल्या प्लॉट धारकांनी दहेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच व सचिव यांना संपूर्ण कागदपत्रासह खरेदी केलेल्या भूखंडांवर भूखंड कर लावण्याबाबत अर्ज सादर करुनही अद्यापही भूखंड कर लावण्यात आले नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धारकांनी खरेदी केलेल्या भूखंडावर कर लावून संबंधितांवर कार्यवाही करण्यात यावी अशा प्रकारचे लेखी निवेदन संबंधित भूखंड धारकांनी नागपूर जिल्हयाचे पालकमंत्री, नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक ५ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रामपंचायतीमधील प्लॉट धारकांनी दहेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच व सचिव यांना संपूर्ण कागदपत्रासह खरेदी केलेल्या भूखंडावर कर लावण्याबाबत अर्ज करुनही यांच्या अर्जाचा विचार करण्यात आला नाही तसेच सरपंच व सचिव यांनी काही आर्थिक व्यवहार करणाऱ्या भूखंडधारकांना भूखंड कर लावून दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर ग्रामपंचायत हद्दीतील पाडाळे लेआऊट मध्ये खरेदी केलेल्या सर्व भूखंड धारकांचे भूखंड कर लावण्याबाबत तसेच पदाचा गैरवापर व नियमबाहय काम करणाऱ्या सरपंच व ग्रामपंचायत सचिवांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) ग्रामपंचायत दहेगांव हे गाव नागपूर महानगर विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) अंतर्गत समाविष्ट असून पादाडे लेआउट एनएमआरडीए द्वारे मंजुर नाही. सदर भूखंडावर नमूना-८ व ९ वर मुळ मालकाच्या नावे प्लॉटची नोंद नमुद असल्याने लेआउट मध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने ग्रामसभा व मासिक सभेत फेरफार घेण्यात येऊ नये, असे सर्वानुमते ठराव पारित करण्यात आलेला आहे. त्यामुळे भूखंड कर लावण्यात आला नाही.

(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर प्रकरणी गट विकास अधिकारी पंचायत समिती, कळमेश्वर यांच्या स्तरावरून चौकशी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील सलोना आरोग्य केंद्रांतर्गत नागापूर गावातील स्तनदा मातेचा उपचारादरम्यान झालेला मृत्यू

**(१६) * १४३८२ श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील सलोना आरोग्य केंद्रांतर्गत नागापूर गावातील स्तनदा मातेचा दिनांक १० जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास अचलपूरच्या महिला व बाल रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या काही महिन्यांपूर्वीच धारणी, सलोना येथे बाल तथा माता मृत्यू झाल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय अचलपूर मधील नागापूर गावातील स्तनदा मातेचा दिनांक १० जून, २०२५ रोजी मृत्यू झाला आहे. तथापि, बाळ जिवंत आहे. सदर मातेची दिनांक ३१ मे,२०२५ रोजी उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर येथे प्रसुती झालेली आहे. प्रसुतीनंतर दि.२ जून,२०२५ रोजी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. दि. १०, जून, २०२५ रोजी आरोग्य सेवा सत्राकरिता आरोग्य कर्मचारी नागापूर येथे गेले असता सदर मातेस ताप असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली. त्यानुसार समुदाय आरोग्य अधिकारी यांनी त्याच दिवशी मातेला उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर येथे संदर्भित केले. त्यानुसार त्यांना दु.३.१० वाजता रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान त्यांची तब्येत खालावत गेल्याने त्यांचा दि.१० जून,२०२५ रोजी दुपारी ३.४० वाजता मृत्यू झालेला आहे. माता-मृत्यू अन्वेषण समितीने मृत्यूचे कारण “ PNC P२L२ Multiple Organ Dysfunction Syndrome (MODS ) (ARDS with thrombocytopenia with acute kidney injury ) possibly due to ? Dengue Shock Syndrome ” असे नमूद आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सौ.निशा निकेश बेलसरे रा.सलोना ता. चिखलदरा जि.अमरावती येथील १९ वर्षीय महिला रुग्ण यांची प्राथमिक आरोग्य केंद्र, सलोना येथे दि.४/३/२०२५ रोजी नोंदणी झाली होती. तद्नंतर दि.४/३/२०२५ व दि. २१/४/२०२५ रोजी या महिला रुग्णाची प्रसूतीपुर्व तपासणी झाली होती. तत्पूर्वी त्यांची सोनोग्राफी देखील करण्यात आली होती. नोंदणी वेळी त्या गर्भवती असल्याचे निदान झाले होते. तपासणीत त्यांच्या खांद्यावर सुज व हाडाचा आजार असल्याचे प्राथमिक निदान झाल्याने त्यांना शस्त्रक्रिया करण्याबाबत सांगितले होते. तसेच आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांनी मातेची वेळोवेळी तपासणी करुन तिचे समुपदेशन करुन सुपर हॉस्पिटल, जि. अमरावती व तेथून इर्विन हॉस्पिटल व त्यानंतर शासकीय

वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे संदर्भित केले होते. परंतु सदर माता दि.३/५/२०२५ रोजी नागपूर येथील रुग्ण्यालयातून पळून सलोना या राहत्या घरी निघून गेल्या. परंतू मातेला जिल्हा रुग्णालय, अमरावती येथे संदर्भित केले तेथून पुढे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे संदर्भित केले असता ,सदर मातेचा दि. १४/०५/ २०२५ रोजी कॅन्सर सदृष्य (Osteogenic Sarcoma with mets) आजाराने मृत्यू झाला त्यावेळी मातेच्या गर्भातील ६ आठवड्याचे अर्भक देखील दगावले आहे. या प्रकरणी योग्य औषधोपचार देण्यात आले असून तसेच महिला रुग्णाच्या मृत्युकरिता कोणी जबाबदार असल्याचे आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न भाग-१ मधील सलोना, चिखलदरा तालुक्यातील दि.१०/०६/२०२५ रोजीच्या मृत्यू घटने संदर्भात जिल्हास्तरावर मेळघाट येथील अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे मार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये प्रसुती पश्चात गृहभेटी बाबत सकृतदर्शनी दोषी आढळून आलेल्या वैद्यकीय अधिकारी व संबंधित कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचा खुलासा घेण्यात आला. तथापि, खुलासा असमाधानकारक असल्याने दोषी आढळलेले दोन वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सेवक आणि आरोग्य सेविका यांची वार्षिक वेतन वाढ रोखण्यात आली आहे. तर समुदाय आरोग्य अधिकारी व कंत्राटी आरोग्य सेविका यांचे एक वार्षिक मानधन वाढ कायस्वरुपी थांबविण्याची शिक्षा अनुक्रमे दि.२०/०६/२०२५ व दि.२६/०६/२०२५ अन्वये बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद लघू पाटबंधारे विभागामार्फत केलेल्या कामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(१७) * १२६६३ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद लघू पाटबंधारे विभागामार्फत केलेल्या भिवंडी, शहापूर व मुरबाड तालुक्यातील कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता, निकृष्ट दर्जाची कामे झाली असून तसेच काही बोगस कामे दाखवून देयके अदा केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले तदनुसार निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदार व संगनमताने बोगस कामांचे फोटो जोडून देयके अदा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही,

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात यंत्रसामुग्री, उपकरणे, साधन सामुग्री व रुग्णवाहिका उपलब्ध करुन देणेबाबत

**(१८) * १०५९३ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील स्व इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री, उपकरणे व साधन सामुग्रीचा तात्काळ पुरवठा करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी

दिनांक २४ फेब्रुवारी,२०२४ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, या रुग्णालयास नवीन दोन रुग्णवाहिका देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रुग्णालयास यंत्रसामुग्री, उपकरणे, साधन सामुग्री तसेच रुग्णवाहिका तात्काळ उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन ते आता २०० खाटांचे करण्यात आलेले आहे. २०० खाटांच्या निकषानुसार आवश्यक यंत्रसामुग्री, उपकरणे व साधन सामुग्री खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये एकूण १२ उपकरणे आहेत. यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत खरेदीची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. या १२ उपकरणांपैकी ०७ उपकरणांची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून ती विहित मुदतीत पूर्ण करुन खरेदी आदेश निर्गमित करण्यात येतील. उर्वरीत ०५ उपकरणांसाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. परंतू, त्यामध्ये एकही पात्र निविदाकार उपलब्ध न झाल्याने फेर निविदा काढण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

तसेच रुग्णवाहिकांच्या निकषानुसार १०० ते २०० खाटांच्या रुग्णालयांसाठी आवश्यक असलेल्या ४ रुग्णवाहिका सदर रुग्णालयात उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साकूर (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथील ग्रामीण रुग्णालयाची दुरुस्ती करणेबाबत

**(१९) * १२२८८ श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साकूर (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथील ग्रामीण रुग्णालयाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून पावसाळयात छतातून पाणी गळणे, अनेक कक्षांमधील छताला भेगा पडल्या असून छतावरील अग्निशमन यंत्रणेची पाच हजार लीटर क्षमतेची टाकी फुटली असल्याने येथे दाखल झालेल्या रुग्णांमध्ये भीतीचे वातावरण असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयाची दुरुस्ती करण्याबाबत वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, साकूर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांच्याकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही दखल घेण्यात येत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित जबाबदार अधिकारी, कंत्राटदार यांचेवर कारवाई करणेसह सदर रुग्णालयाची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१),(२) व (३) साकूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम दि.३१/०७/२०१४ रोजी पूर्ण झाले आहे. सदर इमारतीच्या छतावरील गळती प्रतिबंधक उपायाची वैधता १० वर्षापर्यंतच होती. छत गळतीची वैधता संपल्याने माहे मे, २०२५ मध्ये पावसाच्या पाण्यामुळे छत गळती झाली आहे. तसेच अतिवृष्टीमुळे छतावरील अग्निशमनची ५ हजार लिटर पाण्याची टाकी

फुटली आहे. इमारतीची कामे ही नियतकालीक दुरुस्ती प्रकारची असल्याने ती करणे आवश्यक आहे. तसेच इमारत ही स्ट्रक्चरली पूर्णत: सुरक्षित असून स्ट्रक्चरल ऑडिट ची आवश्यकता नसल्याबाबत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, संगमनेर, जि.अहिल्यानगर यांनी कळविले आहे. सबब, संबंधितांविरुध्द कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही. सदर दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्याकडे जिल्हा शल्यचिकित्सक, अहिल्यानगर यांनी मान्यतेसाठी सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील वागळे इस्टेट एमआयडीसी क्षेत्रातील मे.इंडियन रबर कंपनीच्या कामगारांना थकीत वेतन अदा करणेबाबत

**(२०) * १२४८७ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाण्यातील वागळे इस्टेट रोड नं.२२ येथील एमआयडीसी क्षेत्रातील भूखंड क्रमांक एफ-२ येथील इंडियन रबर कंपनीच्या ४५० कामगारांची थकीत देणी गेली ४० वर्षे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामगारांची थकीत देणी लवकरात लवकर मिळूवन देण्याचे आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी कामगारांना देवूनही विभागामार्फत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामगारांची थकीत देणी तात्काळ मिळवून देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
मे.इंडियन रबर कंपनी, एफ-२, वागळे इस्टेट, ठाणे या आस्थापनेतील कामगारांच्या थकीत देणीबाबत सर्व श्रमिक संघ या संघटनेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेली रिट याचिका क्र.३५११/२००७ व त्यामध्ये सिव्हील ॲप्लिकेशन क्र.२६१४/२०१० मा.उच्च न्यायालयाने दि.२६/०५/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढलेली असून संघटनेने याचिकेमध्ये केलेली मागणी नाकारलेली आहे.
(२) सदर बाब या विभागास अवगत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयात बांधकाम कामगारांना मिळणाऱ्या वस्तुरुपी लाभ या योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२१) * १२७०७ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयात बांधकाम कामगारांना वस्तुरुपी लाभ देण्यासाठी कोटयवधी रुपये खर्च करण्यात येत असून सदरील योजनेमध्ये मोठया प्रमाणात बनावट लाभार्थींची नावे घेवून गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेमध्ये मा.मंत्री सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या स्वीय सहायकाचे नाव असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर गैरव्यवहारातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे खरे नाही.
(२) याबाबत विविध वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिद्ध झाली होती. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीमध्ये मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या स्वीय सहाय्यक यांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. याबाबत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे पडताळणी केली असता, सदर वृत्तपत्रातील नमूद स्वीय सहाय्यकाची मंडळाकडे बांधकाम कामगार म्हणून नोंदणी असल्याचे आढळून आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवापूर (जि.नंदुरबार) शहरामधील पिवळ्या तापाचे रुग्ण वाढत असल्याबाबत

**(२२) * ९४५७ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवापूर (जि.नंदुरबार) शहरामधील अनेक भागांत काही दिवसांपासून पिवळ्या तापाचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळून येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आजाराचे मुख्य कारण दूषित पाणीपुरवठा असल्याचे स्थानिक वैद्यकीय अधिकारी यांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ह्या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.
पिवळ्या तापाचे (Yellow Fever) रुग्ण आज रोजी राज्यात आढळून येत नाहीत.
नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर शहरामध्ये आढळून आलेले एकूण २३ संशयित रुग्ण हे पिवळ्या तापाचे नसून, कावीळ (Jaundice) या आजाराचे आढळून आले होते.
(२) हे खरे नाही. पिवळा ताप (Yellow Fever) हा किटकजन्य आजार आहे.
नवापूर शहरामध्ये आढळलेले संशयित कावीळ रुग्ण हे दूषित अन्न किंवा दूषित पाणी या कारणामुळे बाधित असल्याचे मत जिल्हा आरोग्य अधिकारी, नंदुरबार यांनी कळविले आहे.
(३) नवापूर येथील कावीळ संशयित रुग्णांच्या संदर्भात दि.०९/०४/२०२५ ते दि.१५/०४/२०२५ या कालावधीत एकूण ३७९ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यात २३ संशयित रुग्ण आढळून आले असून त्यांनी आवश्यक औषधोपचार घेतले आहेत. ते सर्व रुग्ण बरे झाले आहेत.
नगरपरिषदेने एकूण २४० पाणी नमुने तपासणीस पाठविले, त्यामध्ये एकही दूषित आढळला नाही. नगरपरिषदेतर्फे हया आजाराबद्दल लोकांमध्ये आवश्यक जनजागृती आणि पाणी शुध्दीकरणाच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील असंघटित कामगारांना कायद्याचे संरक्षण मिळणेबाबत

**(२३) * १०९६६ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तब्बल ३ कोटी ७० लाख असंघटित कामगार असून शेतमजूर आणि कृषी क्षेत्रात ९५ लाख कामगार हे कायद्याच्या कक्षेच्या बाहेर असल्याचे उद्योग विभागाच्या आकडेवारीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने असंघटित कामगारांचा राष्ट्रीय डेटाबेस तयार करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी २०२१ मध्ये ई-श्रम पोर्टल सुरू करण्यात आले असून राज्यात सातत्याने वाढत्या नागरिकीकरणामुळे व ई-कॉमर्स क्षेत्रामुळे असंघटित कामगारांची वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, केंद्र आणि राज्य शासनामार्फत लागू करण्यात आलेल्या सर्व योजनांचा लाभ हा सर्व कामगारांना असंघटित कामगारांप्रमाणे मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

राज्यात विविध क्षेत्रात असंघटीत कामगार फार मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. ई श्रम पोर्टलवर राज्यातील असंघटीत कामगारांना नोंदणी करता येते. दि.०२/०७/२०२५ अखेर राज्यात ई-श्रम पोर्टल वर सुमारे ९५ लाख शेतमजूर आणि कृषी क्षेत्रातील कामगारांनी नोंदणी केलेली आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) केंद्र आणि राज्य शासनामार्फत लागू करण्यात आलेल्या सर्व योजनांचा लाभ संबंधित योजनांचे अटी व शर्तीनुसार पात्र लाभार्थीना देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गेवराई (जि.बीड) येथील गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(२४) * १३७९२ श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथील गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेची प्रभावी अंमलबजावणी न केल्यामुळे शेतकरी लाभापासून वंचित राहिल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत विविध सिंचन प्रकल्प, नदी, बंधारे व ओढे यामधील गाळ काढणेबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी, बीड यांना वारंवार लेखी निवेदनाद्वारे कळवूनही त्याची कार्यवाही विहित मुदतीत करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विलंबाने केवळ तीन प्रकल्पातील गाळ काढणेबाबतचे नियुक्ती आदेश नाम फाऊंडेशन, पुणे यांना दिनांक २६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून दोषींविरुध्द कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांना दिनांक ०४ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसह संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

सन २०२४-२०२५ मध्ये गेवराई तालुक्यामध्ये सदर योजनेअंतर्गत एकूण २२ कामे पूर्ण झालेली असून सदर कामांमधून एकूण २७५४४५ घ.मी. गाळ काढून तो शेतकऱ्यांच्या शेतात पसरविण्यात आला आहे. त्यामुळे २७५.४५ स.घ.मी. पाणीसाठा पुनर्स्थापित होऊन ३७९ शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळालेला आहे.

तसेच, सन २०२५-२०२६ मध्ये गेवराई तालुक्यातील २४ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर योजनांमधून २०५१३१ घ.मी. गाळ काढल्याने २०५.१३ स.घ.मी. पाणीसाठा पुनर्स्थापित करणे प्रस्तावित आहे.

(२) हे अंशत : खरे आहे.

सदर योजनेंतर्गत गाळ काढण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून ३ निवेदने क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेली आहेत. त्यानुसार बीड जिल्ह्याकडून रु.९५.३६ कोटी किंमतीचा सुधारित आराखडा शासनास मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला आहे. निधीची उपलब्धता पाहून सुधारीत आराखड्यातील कामे हाती घेण्यात येतील.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेंतर्गत सन २०२५-२६ मध्ये गेवराई तालुक्यात एकूण २४ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून १५ कामांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ४ कामांचे नियुक्ती आदेश दि. २८/०२/२०२५ रोजी नाम फाऊंडेशन, पुणे व ११ कामांचे नियुक्ती आदेश अशासकीय संस्थाना गाळ काढण्यासाठी जिल्हास्तरीय समितीमार्फत देण्यात आले आहेत.

(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागात कायमस्वरुपी पाणीपुरवठा करणेबाबत

**(२५) * ७१३३ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काठोडा (ता.आर्णी, जि. यवतमाळ) या गावात १२ वर्षीय कु.वेदिका चव्हाण ही पाणी आणण्यासाठी नदीवर गेली असता तिचा नदीत बुडून मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मौजे बोरचिवारी (ता.पेठ,जि.नाशिक) या गावात पिण्याचे पाणी मिळविण्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालून दोरीच्या सहाय्याने खोल विहिरीत महिला उतरत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, यवतमाळ जिल्हयातील अनेक गावांत नागरीकांना भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत असून गावापासून दूर अंतरावर राहणाऱ्या पारधी पाडयावरील महिला व मुलांना पाण्यासाठी दररोज जीव धोक्यात घालावा लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील किती गावांमध्ये, वाड्या-वस्त्यांमध्ये पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे, किती गावांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची गरज आहे, किती गावांना शासनाच्या वतीने टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुसार राज्यातील ग्रामीण भागातील महिलांची पाण्यासाठीची पायपीट दूर करुन कायमस्वरुपी पाणीपुरवठयाची सोय करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे पारधी, बेडा ग्रामपंचायत, पंचायत समिती काठोडा येथील ४ ते ५ मुली दिनांक १३ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी कपडे धुणे तसेच इतर अनुषंगिक कामानिमित्त अरुणावती नदीच्या काठी गेल्या होत्या. त्यामध्ये नदीतील डोहामध्ये कु. वेदिका रुणेश चव्हाण, वय १२ वर्षे ही मुलगी पाय घसरुन पडली असता त्यामध्ये तिचा पाण्यात बुडून दुर्देवी मृत्यू झाला.

(२) अंशत: खरे आहे.

दिनांक २०/०४/२०२५ रोजी मौजे बोरचिवारी येथील एका महिलेस पाणी घेण्यासाठी विहीरीत उतरवुन व्हिडीओ तयार करुन समाज माध्यमांवर कोणीतरी त्रयस्त व्यक्तीने प्रसिध्द केला होता, सदर विहीरीचे पाणी पिण्यासाठी वापरले जात नाही. सदर विहीरी ऐवजी दुसऱ्या सार्वजनिक विहीरीचे पाणी पिण्यासाठी वापरले जाते.

(३) अंशत: खरे आहे.

यवतमाळ जिल्हयाकरिता सन २०२४-२५ पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला असून कृती आराखड्यानुसार ४६८ गावांसाठी ५३९ उपाय योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. या अंतर्गत टंचाईग्रस्त तालुक्यात/गावात विहीर अधिग्रहण व टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. माहे एप्रिल, २०२५ अखेर यवतमाळ जिल्हयातील पुसद, आर्णी व यवतमाळ या ३ तालुक्यात २५ टँकरव्दारे २५ टंचाईग्रस्त गावांना पाणी पुरवठा करण्यात आला असून १० तालुक्यातील ९३ गावात १०४ विहीरी अधिग्रहण करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

मौ. पारधी बेडा (काठोडा), येथे १HP, १००० LPH चालणारा सोलर पंप व १००० लि. LDPE टाकी द्वारे पाणी पुरवठ्याचे काम माहे एप्रिल, २०२२ मध्ये करण्यात आले आहे. त्याद्वारे सुरळीत पाणीपुरवठा सुरू आहे. सदर गावात वेळोवेळी सोलर पंप व हातपंपाची दुरुस्ती निघाल्यास ग्रामपंचायत मार्फत कार्यवाही करण्यात येऊन पाणी पुरवठा सुरळीत करून देण्याचे काम वेळोवेळी केले आहे.

(४) माहे एप्रिल, २०२५ अखेर राज्यात एकूण १८ जिल्ह्यांमध्ये ६४४ गावे व २०५१ वाड्यांमध्ये एकूण ७९६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

(५) ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी केंद्रपुरस्कृत राज्यात जल जीवन मिशन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमांतर्गत राज्यात ५१,५५८ योजना राबविण्यात येत असून, त्यांची अंदाजपत्रकीय किंमत रु.६१ हजार ९३ कोटी इतकी आहे. त्यापैकी २५,५४९ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्या असून त्याद्वारेपाणी पुरवठा सूरू आहे. उर्वरित २६,००९ योजना प्रगतीपथावर आहेत.त्यापैकी अस्तित्वातील पाण्याच्या स्त्रोतांमधून पाणी पुरवठा सूरू असून, ज्या ठिकाणी उपलब्ध स्त्रोताद्वारे पाणी पुरवठा नियमित होत नाही त्या ठिकाणी टंचाई कालावधीत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उत्तरवाढोणा (ता.नेर, जि.यवतमाळ) येथे परवानगीविना खाजगी कंपनीचा बायोगॅस प्लांट उभारला जात असल्याबाबत**

**(२६) * १३०६४ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तरवाढोणा (ता.नेर, जि.यवतमाळ) येथे संबंधित विभागाच्या परवानगीविना खाजगी कंपनीचा बायोगॅस प्लांट उभारला जात असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बायोगॅस प्लांटमुळे पर्यावरणावर परिणाम होणार असून, यासंबंधी कंपनीने उत्तरवाढोणा ग्रामपंचायतीला कोणताही अहवाल सादर न करता विनापरवानगीने बांधकाम सुरु केले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांचेकडे सादर करण्यात आलेल्या अहवालावर अद्यापपर्यंत प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्लांटला स्थगिती देऊन कारवाई न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक २३ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) अशा स्वरुपाची बाब माहे मे,२०२४ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. केंद्रीय जल शक्ती मंत्रालयाची नोंदणी आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ, चंद्रपूर यांनी दि.०१/०७/२०२५ रोजी कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पेण (जि. रायगड) तालुक्याच्या खारेपाटातील हेटवणे-खारेपाट या नवीन जलवाहिनीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२७) * १०१४५ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि. रायगड) तालुक्याच्या खारेपाटातील हेटवणे-खारेपाट या नवीन जलवाहिनीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने ही जलवाहिनी फुटून लाखो लिटर पाणी वाया गेल्याने आजूबाजूच्या शेतपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी व स्थानिक नागिरकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन जलवाहिनीची दुरुस्ती करणेबाबत तसेच संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) व (२) वाशी विभागातील धोंडपाडा येथील ८ ग्रामस्थांकडून मुख्य जलवाहिनीवरील गळती होत असल्याबाबतचा सामुहिक तक्रार अर्ज दि. ०३/०४/२०२४ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पेण उपविभागास प्राप्त झाला होता. पेण उपविभागामार्फत सदर ठिकाणची पहाणी करण्यात आली. ज्या ठिकाणी एअर व्हॉल्व मधून पाणी गळती होत असल्याचे निदर्शनास आले, त्या ठिकाणच्या एअर व्हॉल्वची दुरूस्तीचे काम पूर्ण करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला. सदर एअर व्हॉल्वमधून झालेल्या पाणी गळतीमुळे शेतामधील पिकांचे नुकसान झालेले नाही.
(३) हेटवणे धरण ते शहापाडा धरण वाढीव उद्भव योजना मंजुरीनंतर, निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. सदरचे काम ठेकेदाराने विहित व वाढीव मुदत कालावधी तसेच दंडात्मक कार्यवाही करूनही पूर्ण न केल्यामुळे निविदा शर्तीतील ३-क नुसार संबंधीत कंत्राटदार यांचेकडील काम काढण्यात आले. तसेच, त्यांच्या सदोष कामामधील दुरूस्तीचा खर्च देखील त्यांचेकडून वसुल करण्यात येत आहे. त्यांनी केलेल्या कामाव्यतिरिक्त राहिलेल्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन सदरचे काम अन्य कंत्राटदारास देण्यात आले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृती योजनेच्या लाभाची रक्कम कमी करण्यात आल्याबाबत**

**(२८) * १३२४१ श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील आर्थिक दुर्लभ घटकातील एमबीबीएस/बीडीएस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृती योजनेच्या लाभाची रक्कम कमी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या लाभाची रक्कम कमी केल्यामुळे अनेक पात्र विद्यार्थी व पालक आर्थिक संकटात सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिष्यवृत्तीच्या लाभाची रक्कम कमी करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्थिक गैरसोय होऊ नये याकरीता सदर योजनेच्या लाभाचे स्वरुप पुर्ववत करण्याच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) (२) व (३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेच्या अटी-शर्ती, वितरण कार्यपध्दती व

अभ्यासक्रम विहित करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यातील शासकीय, महानगरपालिका, शासन अनुदानित व खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय/ दंत महाविद्यालयांमध्ये वैद्यकीय व दंत पदवी अभ्यासक्रमास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा खुल्या प्रवर्गातील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील मुलांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के रक्कम तर, मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत अदा करण्यात येत आहे. तसेच सदर योजना राज्यातील अभिमत विद्यापीठात वैद्यकीय व दंत पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देखील काही अटी व शर्तींसह लागू करण्यात आलेली आहे.
(४) व (५) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचा लाभ अनुज्ञेय आहे. यामध्ये विकास शुल्काचा (Development Fee) समावेश नाही. सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टल मार्फत नियमितपणे शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यात येत असते.

-----------------

**नरडाणा (जि.धुळे) एमआयडीसी मध्ये पुण्यातील एका व्यावसायिकाने भूखंडाचा गैरवापर केल्याबाबत**

**(२९) * १४०१८ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नरडाणा (जि.धुळे) एमआयडीसीमध्ये पुण्यातील एका व्यावसायिकाने उद्योग उभा करण्याच्या उद्देशाने १२ एकरचा भूखंड घेतला असून सदरच्या भूखंडावर कोणताही उद्योग उभा न करता शासनाची फसवणूक केली असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा भूखंड बँकेत तारण ठेवून ११ कोटींहून अधिक रुपयांचे कर्ज मंजूर करून ते लाटण्याचा प्रकार या व्यावसायिकाने केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्यानुषंगाने शासनाची फसवणूक करुन सदर औद्योगिक भूखंडाचा गैरवापर करणाऱ्या व्यावसायिकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही,

नरडाणा औद्योगिक क्षेत्रामध्ये मे. बिग पी प्रॉपर्टीज प्रा. लि. यांना भूखंड क्र. टी-१६ क्षेत्र १२०३४ चौ.मी. चे वाटप दि.१३/०८/२०१२ रोजी करण्यात आले आहे. भूखंडाचा प्राथमिक करारनामा दि.०३/०४/२०१३ रोजी व ताबा दि.१२/०३/२०१४ रोजी देण्यात आला आहे. भूखंडाचा विकास कालावधी ५ वर्षे दि.०२/०४/२०१८ पर्यंत होता. त्यामध्ये बांधकाम नकाशे मंजूरी दि.३०/०१/२०१७ रोजी घेतलेली आहे. भूखंडाचा पुर्वनिर्धारीत करारनामा (Predetermined Lease) दि.०६/०२/२०१८ रोजी करण्यात आला आहे. भूखंडावरील बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दिनांक ०२/०४/२०१८ रोजी प्राप्त केला आहे. कोविड १९ च्या नंतर आर्थिक अडचणीमुळे सदर कारखाना बंद पडलेला असून, मे. इंडियन बँक या वित्तीय संस्थेकडून भूखंडाचा ताबा दि. ११/०७/२०२२ पासून घेतला आहे. त्या विरोधात Debt Recovery Tribunal, Pune यांच्याकडे दावा क्र. OA/९६५/२०२३ नुसार भूखंड धारकांनी दावा दाखल केला असून पुढील सुनावणीचा दिनांक ३०/१२/२०२५ आहे. सदर भूखंड वाटपाची कार्यवाही म. औ. वि. महामंडळाच्या धोरणानुसार करण्यात आली आहे.

(२),व (३) म.औ. वि. महामंडळाच्या धोरणानुसार भूखंडधारकास त्यांचा उद्योग उभारणीसाठी कर्ज घेण्यासाठी संमती देण्याचे धोरण आहे. त्यानुसार भूखंडधारकास मे. इंडियन बँक या वित्तीय संस्थेकडून रु.९.९० कोटी कर्ज संमती पत्र महामडळांने दि.०८/०२/२०१८ रोजी दिले आहे. त्याबाबतचा त्रिपक्षीय करारनामा दि.१२/०२/२०१८ रोजी करुन कर्जाच्या बोजाची नोंद महामंडळाच्या दप्तरी घेतली आहे. ॲड. श्री कृष्णा मोरे यांनी मा. दिवाणी न्यायालय, शिंदखेडा येथे सदरहू भूखंडाबाबत तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यावर मा. न्यायालयाने प्रकरणी फिर्याद नोंदवून व सखोल तपास करुन तपासाअंती संबंधितांविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्याचे आदेश पोलीस विभागास दिलेले आहेत.

भूखंडधारकांस वित्तीय संस्थेने किती कर्ज मंजूर करुन वितरीत करावे ही बाब वित्तीय संस्थेशी निगडीत आहे. भूखंडधारक हे वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यास त्रिपक्षीय करारनाम्यामधील अटी व शर्तीनुसार संबंधित वित्तीय संस्था भुखंडधारकाने तारण ठेवलेला भूखंड जाहिर लिलावाद्वारे अन्य उद्योजकास विक्री करण्याची मुभा वित्तीय संस्थेस आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील घोटी शहरास शुध्दीकरणाची प्रक्रिया न करता पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(३०) * १४५२६ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील घोटी शहरास दारणा, वाकी नदीतून कोणतीही शुध्दीकरणाची प्रक्रिया न करता पाणी पुरवठा केला जात असल्याची बाब माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शहरातील जलवाहिन्या जुन्या व आतून गंजल्यामुळे अशुध्द पाणी पुरवठा नागरिकांना होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर शहरास शुध्द पाणी पुरवठा करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

नाशिक जिल्ह्यातील दारणा नदीतून घोटी ग्रामपंचायत मार्फत पाणी उपसा करुन योजनेच्या अस्तित्वातील २.५ द.ल.घ.मी. क्षमतेच्या शुद्धीकरण केंद्रातून पाणी शुद्धीकरण करुन घोटी गावास पाणी पुरवठा केला जातो.

(२) होय हे अंशतः खरे आहे.

अस्तित्वातील वितरण व्यवस्था जुनी झाल्यामुळे नादुरुस्त होते व पाणी पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होतात. तथापि, ग्रामपंचायत घोटी मार्फत वितरण व्यवस्थेची वेळोवेळी दुरुस्ती करुन पाणी पुरवठा सुरळीत करण्यात येतो.

(३) जल जीवन मिशन योजने अंतर्गत घोटी बु. पाणी पुरवठा योजना ता. इगतपुरी, जि. नाशिक ही रु.२०.८१ कोटी किंमतीची योजना मंजूर असून या योजनेचा स्त्रोत भावली धरण आहे. सदर योजनेची कामे ठेकेदारामार्फत प्रगतीत असून योजनेची भौतिक प्रगती ६८% आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चळणी (ता.डहाणू, जि.पालघर) येथे पाण्याच्या टाकीचा स्लॅब कोसळून दोन बालकांचा मृत्यू व एक जण गंभीर जखमी झाल्याबाबत

**(३१)** * **१४०९६ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चळणी (ता.डहाणू, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील सुकड आंबा शिरसून पाडा येथे जलजीवन मिशन अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाकीचा स्लॅब दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास कोसळून दोन बालकांचा मृत्यू व एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी मृत बालकांच्या कुटुंबियांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मृत व जखमींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणेसह दोषी कंत्राटदार व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत सुकड आंबा, ता. डहाणू योजनेतील शिरसोनपाडा येथील उंच साठवण स्थापत्य कामाच्या (टॉप स्लॅब) लगतची लॅडींग कोसळल्याने दोन विद्यार्थीनींचा अपघाती मृत्यू व एक विद्यार्थीनी जखमी झाली आहे.

(२) योजनेच्या कंत्राटदारावर संबंधित मयत विद्यार्थीनींच्या कुटुंबियांमार्फत दि. १८/०३/२०२५ रोजी प्रथम खबर अहवाल क्रमांक ००४२ अन्वये कासा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दि. २१/०६/२०२२ नुसार इयत्ता १ ते १२ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास रू. १,५०,०००/- इतके सानुग्रह अनुदान देण्याची तरतूद आहे. त्यानुसार सुकडआंबा शिरसोनपाडा येथे अपघाती मृत्यू झालेल्या दोन विदयार्थीनींचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या मंजुरी नंतर शिक्षणाधिकारी (योजना), जिल्हा परिषद पालघर यांनी दि. २८/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सानुग्रह अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे.

संबंधित कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांनी कामात निष्काळजीपणा केल्याने दि. २०/०३/२०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्या आदेशान्वये त्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. संबंधित कंत्राटदार मे. हरेश बोरवेल्स यांना काळ्या यादीत टाकणेबाबत शिफारस जिल्हा परिषद, पालघर यांचेकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना करण्यात आली असून प्राधिकरणाच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

तसेच श्री. बी.के. शिंदे, उप अभियंता, उप विभाग डहाणू व श्री. आर. आर. पाध्ये, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांना निलंबित करण्यात आले असून, त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे ) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात सर्पदंशामुळे तीन तरुणांचा झालेला मृत्यू

**(३२) * १४५११ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात सर्पदंशावरील वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने उपचाराअभावी एका आठवड्यात तीन तरुणांचा मृत्यू झाल्याचे दिनांक १२ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू उपजिल्हा रुग्णालयात आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रुग्णालयात आवश्यक सर्व वैद्यकीय सुविधा तातडीने उपलब्ध करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, शहापूर, जि. ठाणे या रुग्णालयात माहे एप्रिल, २०२५ पासून अद्यापपर्यंत ११० रुग्ण दाखल झाले असून, त्यापैकी, उपचारादरम्यान एक मृत्यू झालेला आहे व एका रुग्णास जिल्हा रुग्णालयात संदर्भित करताना वाटेतच मृत्यू झाला आहे. मात्र उपचाराअभावी अथवा सुविधा अभावी मृत्यू झालेले नाहीत.

(२) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालयात सर्पदंशावरील उपचारासाठी भिषक, भूलतज्ञ, वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारीका, आवश्यक ते मनुष्यबळ तसेच ASV व इतर आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध आहे.

(३) उपजिल्हा रुग्णालय, शहापूर येथे सर्पदंशावरील उपचारासाठी वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारीका, आवश्यक ते मनुष्यबळ, तसेच ASV व इतर अत्यावश्यक औषधांचा साठा उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. अतिदक्षता विभागासाठी आवश्यक ते विशेषज्ञ भिषक, भूलतज्ञ व मनुष्यबळ, यंत्रसामुग्री-साधनसामुग्री, औषधसाठा उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील विविध उद्योगांच्या पाणी देयकांची रक्कम प्रलंबित असल्याबाबत

**(३३) * ९७२८ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील विविध उद्योग, साखर कारखाने, शासकीय कार्यालयांसह खाजगी ग्राहकांकडे पाणी बिलापोटी जीवन प्राधिकरणाचे तब्बल रु.८० कोटी इतकी रक्कम थकीत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात सर्वाधिक रु.३२ कोटी इतक्या रकमेची थकबाकी नगरपरिषदेकडे व त्या पाठोपाठ रु.२८ कोटी विविध उद्योजकांकडे थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर थकीत पाणी बिलामुळे जल व्यवस्थापनाचा खर्च करणे गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने पाणी बिलापोटी थकीत रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

यवतमाळ पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती अंतर्गत पाणी बिलापोटी शासकीय कार्यालय व खाजगी ग्राहक यांचेकडे माहे जून, २०२५ अखेर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची एकूण थकीत रक्कम रु. १०८.९६ कोटी इतकी आहे.

(२) होय, हे खरे आहे.

यात माहे जून, २०२५ अखेर यवतमाळ नगरपरिषदेकडे रु.३१.५८ कोटी इतकी थकबाकी असून बिगर घरगुती ग्राहकांकडे रु. ४.३८ कोटी इतकी थकबाकी आहे. तसेच ना-नफा ना-तोटा (संस्थात्मक / शासकीय कार्यालय) ग्राहकांकडे रु.६.९३ कोटी व इतर घरगुती ग्राहकांकडे रु. ६५.२७ कोटी इतकी थकबाकी आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

यवतमाळ शहराचा बराचसा भाग आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याने ग्राहकांची थकित पाणी देयके प्रलंबित राहतात. माहे फेब्रुवारी, २०२२ ते मार्च, २०२३ या कालावधीमध्ये शासनातर्फे व्याज माफीची अभय योजना राबविण्यात आली होती. सदर योजनेबाबत ग्राहकांमध्ये जागृकता निर्माण करुन वसुली वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले होते. बाह्य यंत्रणेव्दारे देखील वसुली वाढविण्याच्या दृष्टीने पथके निर्माण करुन त्यांच्याद्वारे वसुली करण्यात येते.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील जलसंधारण विभागातील के.टी बंधारे शाखा व संरक्षक भिंतीची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(३४) * १२६६४ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील जलसंधारण विभागातील के.टी. बंधारे शाखा व संरक्षक भिंतीची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाची कामे कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने झाली असून त्यास विभागाने सहमती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट दर्जाच्या कामांची त्रयस्थ समितीमार्फत चौकशी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाच्या कामांची दुरुस्ती करणेसह दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गेवराई (जि.बीड) जिल्हा परिषदेने जल जीवन मिशन अंतर्गत निकष डावलून देयके अदा केल्याबाबत**

**(३५) * १३७९८ श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यातील १९२ गावांसाठी रु.१७२ कोटी इतक्या किंमतीचा १७७ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे मंजुर असतानाही वॅपकॉस प्रा.लि. या तांत्रिक सेवा पुरवठादार व पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे विहित मुदतीत ही कामे पूर्ण झालेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रगती कन्स्ट्रक्शन, लातूर या कंत्राटदार कंपनीला काळया यादीत टाकून त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याची घोषणा मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, विभागाने काळया यादीत टाकलेल्या प्रगती कन्स्ट्रक्शन, लातूर या कंत्राटदार कंपनीला माहे मार्च नंतर बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी कोट्यवधी रुपयांची देयके बेकायदेशीररित्या अदा केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने सदरहू काळया यादीत टाकलेल्या कंत्राटदारास निधी वाटपाचे सर्व निकष डावलून संगनमताने कोट्यवधी रुपयांची देयके बेकायदेशीररित्या अदा केल्याप्रकरणी संबंधीत दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत गेवराई (जि.बीड) तालुक्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत १८२ गावांसाठी १७२.४४ कोटी अंदाजित किंमतीच्या एकूण १७७ योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. त्यापैकी ६३ योजनांची कामे १०० टक्के पूर्ण झालेली आहेत व ३० योजनांच्या कामांची भौतिक प्रगती ७५ टक्के पेक्षा जास्त आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत गेवराई तालुक्यामध्ये ७ योजनांची कामे करण्यात येत असून यातील २ कामांची भौतिक प्रगती ७५ टक्के पेक्षा जास्त आहे व ४ कामांची भौतिक प्रगती ५० टक्के पेक्षा जास्त आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) जिल्हा परिषद, बीड यांच्यामार्फत प्रगती कन्स्ट्रक्शन, लातूर या कंत्राटदारास काळया यादीत टाकण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच सदर कंत्राटदाराकडील गेवराई तालुक्यातील ४ योजनांची कामे काढून व त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येवून सदर ४ योजनांची फेरनिविदा करण्यात आली आहे. सदर कंत्राटदारास माहे मार्च,२०२५ नंतर मौजे आड पिंपरी व मौजे लमाणवाडी या दोन योजनांकरीता रु.१६.१७ लक्ष इतके देयक अदा करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात अपघातग्रस्त व्यक्तींना "गोल्डन अवर्स" मध्ये तत्काळ उपचार देण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(३६) * ७५८४ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा (जि.कोल्हापूर) नजीक मद्याळ रस्त्यावर श्री.सिद्धेश रेडेकर या २३ वर्षीय तरुणाचा 'गोल्डन अवर्स'मध्ये उपचार न मिळाल्याने त्याचा अपघाती मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यास तातडीने शासकीय रुग्णवाहिका उपलब्ध न होणे, खाजगी रुग्णवाहिकेत ऑक्सिजनची सुविधा नसणे, आजरा शासकीय रुग्णालयात डॉक्टर नसणे इत्यादी कारणांमुळे तत्काळ उपचार मिळाले नसल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार राज्यातील वाढत्या अपघाताच्या घटना पाहता अपघातग्रस्त व्यक्तींना 'गोल्डन अवर्स' मध्ये तत्काळ उपचार देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

सदर रुग्णासाठी महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा १०८ रुग्णवाहिकेसाठी दि.२०/०४/२०२५ रोजी संपर्क कक्ष येथे सकाळी ११ वाजून ३८ मिनिटांनी कॉल आला असता, अपघात स्थळापासून ग्रामीण रुग्णालय,आजरा येथील रुग्णवाहिका दुसऱ्या रुग्णास संदर्भित करण्यास व्यस्त असल्याने दुसरी नजदीकची उपलब्ध रुग्णवाहिका ग्रामीण रुग्णालय,नेसरी येथून पाठविण्यात आली.सदरची रुग्णवाहिका वेळवशी फाटा अपघात स्थळी दुपारी १२.३६ मी. पोहचली असता रुग्णास त्यापूर्वीच गजानन महाराज ट्रस्ट च्या खाजगी रुग्णवाहिकेतून ग्रामीण रुग्णालय आजरा मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

ग्रामीण रुग्णालय, आजरा येथील कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांनी रुग्णावर उपचार केले. सदर रुग्णाची स्थिती ही अत्यंत गंभीर होती त्यामुळे आजरा येथे उपलब्ध १०२ रुग्णवाहिकेद्वारे रुग्णास उपजिल्हा रुग्णालय, गडहिंग्लज येथे संदर्भित करण्याबाबत विचारणा केली असता रुग्णासोबत असलेल्या सहकार्यांनी रुग्णांस खाजगी रुग्णवाहिकेमधून गडहिंग्लज येथील शासकीय रुग्णालयामध्ये घेऊन न जाता खाजगी रुग्णालयात नेले व तेथेच रुग्णाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही,

१०८ ची रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचेपर्यंत रुग्णाच्या नातेवाईकांनी रुग्णांस खाजगी रुग्णवाहिकेतून ग्रामीण रुग्णालय आजरा येथे उपचारासाठी नेले. रुग्णाची स्थिती गंभीर असल्याने ग्रामीण रुग्णालय आजरा येथिल डॉक्टरांनी रुग्णावर जीवनावश्यक उपचार केले व सदर रुग्णास खाजगी रुग्णवाहिकेतून ऑक्सिजन पुरवठा करत व सलाईनद्वारे जीवनावश्यक औषधे देत उपजिल्हा रुग्णालय गडहिंग्लज येथे संदर्भित केले, तथापि रुग्णाच्या नातेवाईकांनी रुग्णास गडहिंग्लज येथिल खाजगी रुग्णालयात भरती केले व तेथे पुढील उपचारा दरम्यान रुग्णाचा मृत्यू झाला.
(३) सदर प्रकरणी ग्रामीण रुग्णालय आजरा मधील कर्तव्यावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी व स्टाफ यांनी तात्काळ आवश्यक ते सर्व उपचार केले तसेच आजरा ग्रामीण रुग्णालय येथे असणारी १०८ रुग्णावाहिका दुसरा रुग्ण जास्मीन बामणेकर (एक दिवसाचा नवजात अर्भक) यांना संदर्भित करण्यात व्यस्त होती असे उपसंचालक कोल्हापूर यांच्या मार्फत केलेल्या चौकशीमध्ये आढळून आले.
(४) "गोल्डन अवर्स" मध्ये तात्काळ उपचार देण्यासाठी १०८ (आपत्कालीन वैद्यकीय सेवा) व १०२ रुग्णवाहिका संदर्भ सेवेसाठी उपलब्ध केल्या आहेत. तसेच ट्रॉमा केअर सेंटरर्स, ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय स्तरावर अत्यावश्यक (२४X७) सेवा उपलब्ध असतात.

१०८ आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पातंर्गत वाढलेल्या लोकसंख्येच्या निकषानुसार रुग्णवाहिकांची संख्या एकूण १७५६ इतकी वाढविण्यात येत असून सदरची सेवा टप्याटप्याने सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील आयजीएम रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरु करणेबाबत

**(३७) * १४०८२ श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील आयजीएम रुग्णालय शासनाकडे हस्तांतरित होऊन १० वर्षे झाली असूनही सदर रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरु झालेले नसल्याने येथे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांवर वेळेवर उपचार होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयाच्या वारंवार तक्रारी प्राप्त झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास सदर रुग्णालयाला भेट दिली असता रुग्णालयातील हजेरीपत्रकावर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या दैनंदिन नोंदी नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांवर वेळीच उपचार न करता हलगर्जीपणा करणाऱ्या बेजबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करणेसह सदर रुग्णालयात सर्व सोई-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) वैद्यकीय अधिक्षक यांनी रूग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची तात्काळ बैठक घेऊन रुग्णालयात वेळेवर उपस्थित राहून रुग्णसेवा देणेबाबत सुचित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मांडवी (ता.झरी, जि.यवतमाळ) येथीज जिल्हा परिषद शाळेचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३८) * १३३८२ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडवी (ता.झरी, जि.यवतमाळ) येथील जिल्हापरिषद शाळेचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार गावचे सरपंच यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, झरी जामणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद तसेच जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) हे खरे आहे.
(२) तक्रारीचे अनुषंगाने राज्य गुणवत्ता नियंत्रक श्रेणी-२ यांचेमार्फत शाळा इमारत बांधकामाची तपासणी करण्यात आली. बांधकाम समाधानकारक असल्यामुळे संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्यात आली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.